# <u>आजरा नगरपंचायत आजरा</u>

ई-निविदा सुचना

सन २०२१-२२

मुख्याधिकारी आजरा नगरपंचायत, आजरा यांचेकडून विद्युत विभागाकरिता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदार, जे पूर्वअर्हता अटी पूर्ण करतील अशा ठेकेदारांकडून फक्त ऑनलाईन पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे. या निविदेच्या पुर्वअर्हता अटी व सविस्तर निविदा सुचना तसेच सदर कामाबाबतचे वेळापत्रक शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावरुन डाऊनलोड करता येईल.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाना रक्कम | सुरक्षा ठेव २% व बिलातून ७% | निविदा प्रपत्र फी | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | आजरा नगरपंचायत कडील नगरपंचायत कार्यालय येथे ५ कि.वॅ. व विद्युत दिव्याकरिता १५ कि.वॅ. क्षमतेचे पारेषण संलग्न सौर उर्जा प्रकल्प आस्थापित करणे | ८,७६,४४७/- | ८,७६४/- | १७,५२९/- | २०००/- | ४ महिने |

मुळ निविदा लाऊनलोड व अपलोड करण्याच्या तारखा खालीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| ई-निविदा प्रसिध्दी दिनांक | दिनांक - ०८/१०/२०२१ |
| ई-निविदा व दस्तावेज डाऊनलोड दिनांक | दि - ०८/१०/२०२१ रोजी ११.०० वा. पासून ते दि - २०/१०/२०२१ दुपारी ४.०० वा. पर्यंत |
| ई-निविदा व दस्तावेज दाखल करण्याचा दिनांक | दि - ०८/१०/२०२१ रोजी ११.०० वा. पासून ते दि - २०/१०/२०२१ दुपारी ४.०० वा. पर्यंत |
| ई-निविदा उघडण्याचा दिनांक | दिनांक - २१/१०/२०२१ |

**अटी व शर्ती :-**

१. निविदा फॉर्म फी व बयाना रक्कम फक्त ऑनलाईन पध्दतीने भरावयाची असून भरण्याची मुदत दि. २०/१०/२०२१ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत राहील. तसेच कंत्राटदाराने सर्व कागदपत्रे ऑनलाईन अपलोड करावे.

२. कोणतीही अथवा सर्व निविदा, त्यासाठी सर्व कोणतेही कारण न दर्शविता नाकारण्याचा हक्क राखून ठेवण्यात आला आहे.

३. करारनाम्यात नमूद केल्याप्रमाणे काम सुरु न केल्यास किंवा काम अर्धवट सोडल्यास ठेकेदाराचे बयाना अनामत जप्त केली जाईल व काम दुस-या ठेकेदाराकडून करुन घेण्यात येईल.

४. सदर प्रकल्पाचे कामकाज पूर्ण होईपर्यंत कोणतेही प्रकारचे दर वृध्दी (Price Escalation) देय नाही.

५. सदर कामाची एकूण सुरक्षा अनामत १० टक्के असेल. इसारा रक्कमेच्या स्वरुपात १ टक्का रक्कम ऑनलाईन ई-निविदेसोबत भरावी. २ टक्के अनामत रक्कम नगरपंचायतीकडे रोखीने अथवा डी.डी., आर.टी.जी.एस. द्वारे भरणा करणे आवश्यक राहील. ७ टक्के सुरक्षा अनामत रक्कम देयकातून (Running Bill) कपात करण्यात येईल. कामाचा कालावधी संपल्यानंतर कंत्राटदाराकडून कोणतीही रक्कम नुकसान भरपाई रक्कम म्हणून घेणे नाही याची खातर जमा केल्यानंतरच जमा असलेली सुरक्षा अनामत जोखीम कालावधी समात्र्त झाल्यानंतर परत करण्यात येईल. सदर कामाचा जोखीम कालावधी हा ६ महिन्याचा राहील.

६. कामाची गुणवत्ता तपासणी (Third Party Inspection) नगर विकास विभाग शासन निर्णय २८/०३/२०१८ मध्ये नमूद केलेल्या शासकीय यंत्रणेकडून अथवा महाराष्ट्र ऊर्जा विकास अभीकरण (महाऊर्जा) यांचेकडून करुन घ्यावे लागेल.

७. कंत्राटदारास GST संदर्भात शासनाने वेळोवेळी दिलेले आदेश पाळणे बंधनकारक राहील.

८. कोणत्याही कारणाने प्रकल्पाच्या बांधकामात क्षती निर्माण झाल्यास संपूर्ण बांधकामाची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

९. सदर कामे करताना काही अपघात होऊन वित्त हानी किंवा जिवितहानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१०. या शिवाय सदर कामे करण्याबाबत शासनाचे आदेश निर्देश वित्तिय नियम व नगरपरिषद लेखा सहितेनुसार सदर कामाबाबत इतर अटी व शर्ती निविदाधारकास पाळणे बंधनकारक राहील.

११. वरील निविदा प्रक्रिया कुठल्याही क्षणी कोणत्याही टप्यावर कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.

१२. करारनामामध्ये नमूद केलेल्या मुदतील काम पूर्ण न झाल्यास मुदतीबाहेर प्रत्येक दिवसास रक्कम रुपये ५००/- प्रमाणे दंड आकारला जाईल.

१३. सदरचे काम महाराष्ट्र ऊर्जा विकास अभीकरण (महाऊर्जा) यांचेकडील तांत्रिक मान्यता मिळालेल्या अंदाजपत्रक व स्पेसिफिकेशन प्रमाणे सर्व कामे पूर्ण करावयाचे आहे तसेच झालेल्या कामाचे बिल काम पूर्ण केल्यानंतर आयकर व सेस व विमा तसेच इतर शासकीय कर बजा करुन शिल्लक रक्कम अदा केली जाईल.

१४. वरील कामावर मुख्याधिकारी, अभियंता व पाणी पुरवठा तसेच विद्युत विभागातील कर्मचारी यांना देखरेख करण्याचा अधिकार राहील. (त्यांनी दिलेल्या सुचना अमंलात आणाव्यात).

१५. निविदा कामकाजा संबंधात म्हणजे निविदा सादर करणे, निविदा संदर्भातील कागदपत्रे सादर करणे, निविदा उघडणे, कामाचा आदेश घेणे, करारनामा करुन देणे-घेणे, बिल सादर करणे, धनादेश स्विकारणे इत्यादी साठी ठेकेदारास त्यांचे प्रतिनिधी नेमायचे असल्यास रु. १००/- च्या स्टँप पेपरवर सक्षम प्राधिकारी यांचे कडील प्रतिज्ञापत्र किंवानोटराईज ॲथॅरिटी लेटर सार करणे आवश्यक राहील.

१६. मा. आयुक्तसो, भविष्य निर्वाह निधी यांचे पत्र जा.क्र. MH/PF/PN/306960/CIR/IV/2721 दिनांक १६/०३/२०१५ नुसार ठेकेदाराने नेमलेल्या भविष्य निर्वाह निधीचे खाते उघडणे बंधनकारक आहे. व सदर कर्मचा-याच्या खात्यावर दर महा २५.६१ टक्के दराने रक्क भरणे बंधनकारक आहे. सबब प्रत्येक कर्मचा-याचे हजेरी रजिस्टर, वेतन रलिस्टर ठेवएणे बंधनकारक आहे. व त्यानुसार कर्मचा-यांना अदा केलेले तेतन रजिस्टरच्या व कर्मचा-याच्या ई.पी.एफ. नंबर काढून त्यांच्या

झेरॉक्स प्रति बिलाला जोडणे बंधनकारक आहे. ठेकेदारानेबिल सादर करताना कर्मचा-याची भविष्य निर्वाह निधीची रक्कम व फंड कार्यालयाकडे भरलेली रक्कम यांचे सत्यप्रत सादर करणे बंधनकारक राहील.

१७. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र. बी.डी.जी.-२०१६/प्र.क्र२/इ.मा.२ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दि. १२/०२/२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार निविदाधारकांनी खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

- प्राप्त निम्नत्तम निविदेचा देकार निविदाधिन कामाच्या किमंती पेक्षा १० टक्के पर्यंत कमी दराचा असेल तर ठेकेदारानी निविदाधिन किमतीच्या १ टक्के एवढया रक्कमेचा धनाकर्ष (Demand Draft) परफॉर्म सिक्युरीटी म्हणून निविदेच्या लिफाफा क्र. २ मध्ये सादर करावा. (स्कॅन करुन निविदेसोबत सादर करावा).
- प्राप्त निम्नत्तम निविदेचा देकार निविदाधिन कामाच्या किमंती पेक्षा १० टक्के जास्त दराने कमी असेल तर देकार १० टक्के पेक्षा जेवढया जास्त दरानेकमी आहे तेवढया रक्कमेच्या वरील बाब २ प्रमाणे येणा-या रक्कमेसह एकत्रित धनाकर्ष(Demand Draft) निविदेसोबत लिफाफा क्र. २ मध्ये सिलबंद करुन सादर करावा.
- धनाकर्ष जमा करणे करिता निविदा धारकांनी खालील प्रमाणे कार्यवाही करावी.
  a. धनाकार्ष निविदा बोलविणा-या मुख्याधिकारी, आजरा नगरपंचायत आजरा यांच्या नावे असावा.
  b. धनाकर्ष सरकारी बँका किंवा शेडयुल्ड बँकाकडून काढलेला असावा.
  c. धनकर्षाची मुदत निविदा भरण्याच्या दिनांकानंतर किमान ३ महिन्यापर्यंत असावी.
  d. धनकर्षाची प्रत स्कॅन करुन ई-निविदा भरताना ठेकेदारांनी अपलोड करावी.

  e. धनाकर्ष सिलबंद लिफाफयामधून कंत्राटदारांनी निविदा स्विकृतीच्या दिनांकापासून ५ working days नगरपंचायत कार्यालयात जमा करावा. लिफाफावर कामाचे नांवा व निविदा सुचना क्रमांक लिहिन्यात यावा.
  f. धनाकर्षावर बँकेचा MICR व IFSC कोड नंबर असणे आवश्यक आहे.

१८. नगरपंचायतीशी किंवा नगरपंचायतीच्या अधिन किंवा नगरपंचायतीने किंवा नगरपंचायतीच्या वतीने करण्यात येणा-या संविदेमध्ये नगरपंचायतीच्या कोणत्याही नगरसेवकाचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध किंवा आमच्याशी भागीदारी नाही. याबाबतचे विहीत नमून्यातील प्रतिज्ञापत्र किंवा नोटराईज ॲथॉरिटी लेटर रु. १००/- च्या स्टँप पेपरवर सादर करणे आवश्यक राहील.

१९. निविदेतील BOQ मध्ये जी.एस.टी. चे दर समाविष्ट नाहीत. त्यामुळे जी.एस.टी. चे दर बाबत ठेकेदाराने अदा केलेल्या रक्कमेच्या आधारे अदा करणेत येईल.

२०. उपरोक्त काम महाराष्ट्र ऊर्जा विकास अभीकरण (महाऊर्जा) व महावितरण यांच्या निर्देशानुसार पूर्ण करणेची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

२१. प्रकल्प स्थापित झालेनंतर ठेकेदाराने ५ वर्षे देखभाल व दुरुस्ती करणे बंधनकारक राहील.

२२. सदर काम स्थापित करण्यासाठी केंद्र शासनाने ऊर्जा मंत्रालय व भारतीय सौर ऊर्जा निगम लिमिटेड यांनी वेळोवेळी जाहिर केलेल्या तांत्रिक परिमाण व प्रचलित पध्दतीचा अवलंब करणे आवश्यक राहील.

२३. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभीकरण (महाऊर्जा) यांचेकडील तांत्रिक मंजूरी आदेशातील अटी व शर्ती लागू राहतील.

२४. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभीकरण (महाऊर्जा) यांचेकडील मार्गदर्शनानुसार काम करणेचे आहे.

२५. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ व महाराष्ट्र नगरपरिषद लेखा सहिंता १९७१ संबंधित सर्व तरतुदी व नियम हे मक्तेदारावर बंधनकारक राहतील.

२६. काम सुरु झालेनंतर आवश्यक ते सर्व साहित्याचे, कामाचे टेस्ट सर्टिफिकेट जोडणे बधंनकारक राहील.

२७. सौर ऊर्जा क्षेत्रामध्ये काम केलेचे अनुभव असणे बंधनकारक राहिल.

२८. पारेषण संलग्न सौर ऊर्जा प्रकल्प व व सौर पथदिवे यांची आस्थापना ही उत्कृष्टरित्या आणि नविन व नविकरणीय ऊर्जा मंत्रालय भारत सरकार यांच्या तांत्रिक निकषाप्रमाणे असणे बंधनकारक राहील.

२९. पारेषण संलग्न सौर ऊर्जा प्रकल्प व सौर पथदिवे यांची हमी कालावधी हा ५ वर्षांचा राहील आणि सोलार मॉडेची वॉरंटी १० वर्षे इतकी राहील.

३०. पारेषण संलग्न सौर ऊर्जा प्रकल्प व सौर पथदिवे सुरळीत न चालल्यास पुरवठा करणा-या मक्तेदाराने होणारी नुकसान भरपाई नगरपंचायतीस देणे बंधनकारक राहील.

३१. पारेषण संलग्न सौर ऊर्जा प्रकल्प व सौर पथदिवे आस्थापित झालेनंतर महाऊर्जा मार्फत तांत्रिक तपासणी करुन बिल अदा करणेत येईल.

३२. निविदेमध्ये जोडलेले साईट व्हिजीट रिपोर्ट जोडणे बंधनकारक राहील.

३३. निविदेतील दर हे जी.एस.टी. रक्कम सोडून असल्याने नंतर बिलाप्रमाणे जी.एस.टी. रक्कम अदा करणेत येईल.

**पूर्व अहर्ता - तांत्रिक बोलीचा लिफाफा क्रमांक -**

विहीत ई-निविदा पत्र/संच अपलोड केलेल्या प्रतीचे वेगवेगळया दोन लिफाफामध्ये साक्षाकिंत करुन सादर करणे आवश्यक आहे. निविदा लिफाफा क्र. १ मध्ये खालील प्रमाणे कागदपत्रे सादर करावीत.

**<u>बयाना रक्कम व निविदा रक्कम भरलेली छायांकित प्रत</u>**

1. नोंदणी परवाना/लायसन्स
2. पॅन कार्ड व जी.एस.टी. प्रमाणपत्र
3. भविष्य निर्वाह निधीबाबत रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट जोडावे.
4. कामाचा अनुभव प्रमाणपत्र
5. परिशिष्ट-अ
6. आयकर दाखल प्रमाणपत्र

**<u>वित्तीय बोलीचा लिफाफा - २</u>**

1. लिफाफा क्रमांक २ मध्ये ई-निविदा संचाव्यतिरिक्त कोणतीही कागदपत्रे जोडू नये. कामाची/पुरवठयाची दर/किंमत नमुद करावी.
2. वरील लिफाफा क्र. १ व लिफाफा क्र. २ सिलबंद करुन दोन्ही लिफाफे एका मोठया पाकिटामध्ये बंद करुन त्यावर स्वच्छ अक्षरात कामाचे नांव व निविदा क्र. ठळक अक्षरत नमूद करुन मुख्याधिकारी, आजरा नगरपंचायत आजरा यांचेकडे विहित मुदतीत म्हणजेच दिनांक

२०/१०/२०२१ रोजी नगरपंचायत कार्यालयात पोहोचतील अशा बेताने पाठवावेत. केवळ विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या निविदाच स्विकारल्या जातील.

3. लिफाफा क्र. २ मध्ये विहित मुळ निविदा स्वच्छ अक्षरात खाडाखोड न करता सशर्त अतिरिक्त अटी व शर्ती नमूद बॉल पेनने किंवा शाई पेनने लिहिलेली अंकात व अक्षरी आकडे भरुन नमूद करण्यात आलेले दर सर्व करासह, सर्व खर्चासह विविदापत्र सिलबंद लिफाफामध्ये सादर करावी.
4. वरील लिफाफा क्र. १ मध्ये विहित कागदपत्रे सादर करावी व लिफाफा क्र. २ मध्ये दर भरलेले निविदासंच व लिफाफे सिलबंद करावेत. अन्यथा निविदा अपात्र ठरवून लिफाफा क्र. २ उघडयात येणार नाही.

**निविदा छाननी -**

1. दिनांक २०/१०/२०२१ रोजी प्राप्त झालेल्या निविदाधारकांची लिफाफा क्र. १ दिनांक २०/१०/२०२१ रोजी उपस्थित समक्ष मुख्याधिकारी यांचे दालनात निविदा समिती समोर उघडण्यात येतील. तसेच लिफाफा क्र. १ उघडण्याच्या दिवशी आपण किंवा आपण लेखापत्राद्वारे प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीला हजर राहता येईल. निविदा उघडताना पुरवठादार हजर न राहिल्यास त्यांचे अनुपस्थितीत निविदा उघडण्यात येतील व त्यानंतर कोणतीही तक्रार ऐकूण घेतली जाणार नाही.
2. लिफाफा क्र. १ उघडून आवश्यक कागदपत्रांची छाननी केली जाईल व पात्र अथवा अपात्र निविदाबाबत अभिप्राय नोंदविल्यानंतर केवळ पात्र निविदाधारकाचा लिफाफा क्र. २ उघडला जाईल.

**निविदा स्विकारणे/फेटाळणे -**

1. निविदेसोबत इसारा रक्कम न भरल्यास आवश्यक कागदपत्रांपैकी कागदपत्र सादर केलेल्या प्रमाणपत्रातसहेतूक दुरुस्ती बिघाड/चूक केल्याची आढळून आल्यास आणी पुरवठापप्रदान केल्यानंतरही कोणत्याही टप्याला तसे मागावून तपासात दिसून आल्यास/निदर्शनास आल्यास व्यवसायावर बंदी आणण्यास हितसर्व आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. त्याशिवाय निविदाधारक कायद्याअंतर्गत अभियोगास पात्र ठरतील. कोणत्याही कागदपत्रात खरेपणा न आढळल्यास तसेच निविदा सादर करताना भ्रष्ट व कपट मार्गाचा अवलंब केल्याचे निदर्शनास आल्यास सशर्त निविदा सादर केल्यास नगरपरिषदेने समक्ष उत्पादक/विक्रेते/व्यवयायधारक/संस्था/नामांकीत कंपन्या व पुरवठा धारक निवडण्याकामी आवश्यक ठरविलेल्या पात्रता पूर्ण करु न शकल्यास अशा परिस्थितीत निविदा फेटाळण्यात येईल.
2. सर्वसाधारण व शक्यतो कमी दराच्या निविदा नगरपंचायतीच्या मान्यतेनंतर स्विकारण्यात येतील किंवा कारणे नमुद करुन अथवा सबळ कारणास्तव कमी दराची/उच्चतम दराची निविदा मंजूर करण्याचा, निविदा अटी शर्ती मध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचा अधिकार व कोणतेही कारण नमूद करुन अथवा असे कारण न देता आलेल्या निविदा स्विकारणे अथवा फेटाळण्याचा अधिकार नगरपंचायतीने राखून ठेवला आहे.

सही/-

मुख्याधिकारी

आजरा नगरपंचायत आजरा

**SITE VISIT REPORT LETTER**

(To be submitted separately for each location on letterhead of bidder)

Date : ________________

To,

Ajara Nagarpanchayat, Ajara

Sub : Site Visit Report for installation of (Mention KW respective project Capacity) at (Mention name of respective Site Location).

Ref : Maha Tender No. ____________________________________

Sir,

This has reference to above referred tender fo electrification of ____________________ (Mention respective site name) to be electrified through Solar Power. I/We herenby declare that we have visited site. I/We made ourselves acquainted with site conditions, approach to site, requirement of land, soil condition, availability of water, requirement of tender conditions etc.

I/We verified all details required to execute the projects. I/We have no problems in undertaking the projectsand complete them in the given time period.

Thanking you.

Yours faithfully

Signature of Bidder _________

Seal ________________

Name of Bidder ________________

Chief Officer

Ajara Nagarpanchyat

# परिशिष्ट - अ

# प्रतिज्ञा पत्र

मी/आम्ही याद्वारे असे नमूद करतो की, महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 16 (1) (आय) व कलम 44 (1) (ब) तरतुदीच्या ज्या खाली उदधृत केलेल्या आहेत, माहीती आहे आणि गंभीरपणे नमूद करतो की, नगरपालिकेशी किंवा नगरपालिकेच्या अधिन किंवा नगरपालिकेने किंवा नगरपालिकेच्या वतीने करण्यात येणा-या संविदेमध्ये नगरपरिषदेच्या कोणत्याही नगरसेवकाचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध किंवा आमच्याशी भागीदारी नाही. कलम 16 (1) (आय) :- या पुढे तरतुद केली असेल त्या व्यतिरिक्त, नगरपालिकेच्या आदेशावरुन केलेल्या कोणत्याही कामात किंवा नगरपालिकेशी किंवा नगरपालिकेच्या अधिक किंवा नगरपालिकेने किंवा नगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल. कलम 44 (1) (ब) :- पालिका सदस्य म्हणून किंवा नगरपालिकेच्या कोणत्याही समितीचा सदस्य म्हणून ज्या कोणत्याही बाबतीत कलम 16 चे पोट-कलम (3), खंड (अ),(ब),(क),(इ) व (ग) मध्ये वर्णन केल्या प्रमाणे त्याचा किंवा त्यांच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असले. मग अशा हिश्याची किंवा हितसंबंधाची किमंत काहीही असो,जीत त्याच्या अशीलाच्या, प्रकर्त्याच्या किंवा इतर व्यक्तिंच्यावतीने व्यावसायिकदृष्टया त्याचा हिस्सा किंवा हितसंबंध असेल अशा कोणत्याही बाबतीत मतदान करील.

निविदाधारकाचे नांव :- ----------------------------------------------------------------------------------------------

पत्ता - --------------------------------------------------------------

निविदाधारकाची सही

दिनांक :-

साक्षीदाराचे नांव :- -------------------------------------------------------------------------------------------------

पत्ता - --------------------------------------------------------------------

साक्षीदाराची सही

दिनांक :-